नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/१०/२०२६ (गुरूवार)

नागपूर ग्रामीण पोलीसांची मोठी कारवाई
दादरा आणि नगर हवेली येथे प्रतिबंधित नायलॉन मांजाची निर्मिती करणारा कारखाना उघडकीस; ६ कोटी २६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात सहा पोलीस निरीक्षक श्री स्नेहल राउत यांच्या पथकाने पर्यावरणास हानिकारक आणि नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या उत्पादन व पुरवठा साखळीविरुद्ध कारवाई करत गोपनीय माहिती, तांत्रिक पुरावे प्राप्त करून सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि बॅकवर्ड लिंकच्या आधारे औद्योगिक परिसर, डेमीनी रोड दादरा आणि नगर हवेली येथील नायलॉन मांजा निर्मितीचा करखाना उघडकीस आणला. सदर कारवाईत प्रतिबंधित नायलॉन मांजा, त्याच्या निर्मितीसाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री आणि इतर साहित्य असा एकूण ६ कोटी २६ लाख ४३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


दिनांक ०८/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील कळमेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा गोंडखैरी येथील व्ही.आर.एल. लॉजिस्टिक यार्डमध्ये कंटेनर क्रमांक जि.जे २१ वाय ३३१८ मधून प्रतिबंधित नायलॉन मांजाची वाहतूक करणाऱ्या आरोपीला अटक करून १,२०० नग नायलॉन मांजाच्या प्लास्टिक चक्री किंमत १४,४०,०००/— रुपये, तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला कंटेनर, किंमत २०,००,०००/— रुपये, असा एकूण ३४,४०,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. याप्रकरणी कंटेनर चालक छविनाथ मोहन निषाद, वय ३० वर्षे, रा. उत्तर प्रदेश, याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या पुरवठयाबाबत साखळींचा सखोल तपास सुरू केला. वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या कंटेनरमधून जप्त करण्यात आलेल्या नायलॉन मांजाचा मूळ स्रोत शोधण्यासाठी पोलीसांनी गोपनीय माहितीचे संकलन, तांत्रिक पुराव्यांचे विश्लेषण करून सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. कंटेनर मधील पावत्याच्या आधारे विविध राज्यात तपास पथके पाठविण्यात आले. गुजरात येथील पत्त्याचा शोध घेणे कामी एक पथक गुजरात येथे गेले असता नमुद पत्ता खोटा असल्याची माहीती प्राप्त झाली. तरी सुध्दा तपास पथाकने सातत्याने साखळी पुरावे जोडुन तपास सुरू ठेवला या तपासातून प्रतिबंधित नायलॉन मांजाची निर्मिती दादरा आणि नगर हवेली येथील औद्योगिक परिसरात केली जात असल्याची माहिती समोर आली.त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दादरा आणि नगर हवेली येथे जाऊन तपास सुरू केला. मार्मिक इंडस्ट्रीज या कंपनीबाबत माहीती प्राप्त झाली. सदर कंपनी ही बंद असल्याने पोलीस पथकाने नमुद कंपनीची झडती घेण्याबाबत मा.न्यायालयाला विनंतीपत्र सादर केले. मा. न्यायालयाने विनंती मान्य केल्याने नमुद पोलीस पथकाने स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने दिनांक २१/१०/२०२६ रोजी सदर कंपनी उघडुन पंचासमक्ष सदर ठिकाणी तपासणी व झडती पंचनामा केला. सदर ठिकाणी प्रतिबंधित नायलॉन मांजाची निर्मिती व पॅकिंग करण्यासाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री, विविध प्रकारच्या प्लास्टिक चक्रींवर गुंडाळलेला नायलॉन मांजा, कच्चा माल, पावडर, पॅकिंग साहित्य, विविधक कंपन्याचे रबरी स्टॉम्प आणि इतर संबंधित साहित्य आढळून आले.

पंचनाम्यादरम्यान **Gold, Shakti, Cobra, Monokite, Gold kite, Hero plus, Gold shakti, welyn mono** अशा विविध ब्रँडच्या नावांनी तयार करण्यात आलेला नायलॉन मांजा, त्याचे उत्पादन व गुंडाळणी करण्यासाठी वापरण्यात येणारी चक्की, यंत्रे तसेच पॅकिंगसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले. याशिवाय प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या निर्मितीशी संबंधित इतर साहित्याचीही तपासणी करून जप्तीची कार्यवाही करण्यात आली. सदर कारवाईत ८८ हजारांपेक्षा जास्त नायलॉन मांजाच्या चक्रयांसह एकुण ५ कोटी ०९ लाख ३ हजार १०० रूपयांचा तयार नायलॉन मांजा, ९५ लाखांचे नायलॉन मांजा तयार करणारी यंत्रसामग्री(मशिन) तसेच नायालॉन मांजा तयार करण्याचा कच्चा माल आणि इतर साहीत्य असा एकुण ६ कोटी २६ लाख ४३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईमुळे प्रतिबंधित नायलॉन मांजाची केवळ वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यापुरते मर्यादित न राहता, त्याच्या उत्पादनाच्या मूळ ठिकाणांपर्यंत पोहोचून साखळी उघडकीस आणण्यात नागपूर ग्रामीण पोलीसांना यश मिळाले आहे. नमुद प्रकरणाचा अधिक तपास नागपुर ग्रामीण पोलीस करीत आहे.











अवैध हातभट्टी दारू निर्मिती विरोधात कळमेश्वर पोलीसांची विशेष मोहीम
पारधी बेडा गोंडखैरी येथे कारवाई करत १५ गुन्हे नोंद
१३ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभागयांच्या नेतृत्वात दिनांक २१/१०/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्यासह कळमेश्वर पोलीस, दंगा नियंत्रण पथक यांनी पारधी बेडा गोंडखैरी शिवारात मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींविरूध्द कारवाई केली. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण १५ गुन्हे नोंदविण्यात आले आहे

कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन गोंडखैरी शिवारात हातभट्टी दारू निर्मितीची खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीस पथकाने पारधी बेडा गोंडखैरी शिवारात कारवाई करत घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या. सदर कारवाईत **एकुण ३२,००० लिटर मोहाफुल सडवा किंमती ११,२०,०००/— रूपये, ७६० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ७६,०००/—रूपये, प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम, डबकी, जळाऊ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य किंमती १,३९,९००/—रूपये असा एकुण १३,३५,९००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

सदर प्रकरणी एकुण १५ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये प्रत्येकी ०१ असे एकुण १५ गुन्हे नोंदविण्यात आले आहे. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला आहे.





अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक २१/१०/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत **पोलीस स्टेशन भिवापूर** हद्दीत आरोपी **कर्मवीर राजन कलसे, वय ३५ वर्ष, रा. भिवापुर, ता. भिवापुर जि नागपुर** हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपीविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर